मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांचा दहावीचा निकाल 90.24 टक्के

## महापालिकेने राबविलेल्या विविध उपक्रमांना या निकालातून यश मिळाल्याचे दिसून आले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांनी यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून महापालिकेच्या १७ माध्यमिक मराठी शाळांचा एकूण निकाल ८८.५९ टक्के लागला आहे. तसेच उर्दू माध्यमाच्या ८ शाळांचा निकाल ९७.८७ टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी महापालिकेने राबविलेल्या विविध उपक्रमांना या निकालातून यश मिळाल्याचे दिसून आले आहे.

महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे तसेच प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले आहे.

(उर्वरित पान २ वर)



### विद्यार्थ्यांचा केला जाणार सन्मान

» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार असून त्यांना पारितोषिक देण्यात येणार आहे. यामध्ये ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी १ लाख रुपये, ८५ ते ८९.९९ टक्के गुण प्राप्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये, ८० ते ८४.९९ टक्के गुण प्राप्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये तसेच दिव्यांग उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे.

> महापालिकेच्या शाळांनी यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांनी केलेले कठोर परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. भविष्यातही विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी यंदा मिळवलेले यश अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी घेतलेली मेहनत आणि शिक्षण विभागाने राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे हे फलित आहे. आगामी काळातही शिक्षणाची गुणवत्ता अधिक वाढवून विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक वातावरणात सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.
>
> - ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी महावितरणाचा पुढाकार

## महावितरणच्या भोसरी विभागांतर्गत बोराडेवाडी परिसरात जनजागृती मोहीम संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेली 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' घराघरात पोहोचवण्यासाठी महावितरणच्या भोसरी विभागांतर्गत येणाऱ्या मोशी शाखेच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमांतर्गत मोशी येथील संजय गांधी नगर, बोराडेवाडी परिसर, तसेच बारणे वस्ती आणि परिसरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांना या योजनेची सविस्तर माहिती दिली. महावितरणच्या या पुढाकारामुळे नागरिकांना आता आपल्या घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवून वीजबिल शून्य करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.



या मोहिमेदरम्यान अधिकाऱ्यांनी नागरिकांना सौर ऊर्जा प्रकल्पाचे विविध फायदे समजावून सांगितले. या योजनेनुसार १ किलोवॅट प्रकल्पासाठी ३०,००० रुपये, २ किलोवॅटसाठी ६०,००० रुपये आणि ३ किलोवॅट किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७८,००० रुपयांपर्यंतचे अनुदान थेट बँक खात्यात जमा केले जाते. या माध्यमातून दरमहा ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळू शकते, ज्यामुळे घरगुती ग्राहकांचे वीजबिल पूर्णपणे शून्य होऊ शकते. विशेष म्हणजे, छतावरील सौर पॅनेलद्वारे उत्पादित झालेली वीज स्वतः वापरून उरलेली जास्तीची वीज महावितरणला विकून अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याची सोयही या योजनेत आहे. या प्रकल्पाची वीज निर्मिती क्षमता २५ वर्षांपर्यंत असून, विविध बँकांमार्फत सवलतीच्या दरात कर्ज सुविधाही उपलब्ध करून दिली जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

तसेच, राज्य सरकारच्या स्मार्ट योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील आणि १०० युनिटपेक्षा कमी वापर असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळून ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत भरीव अनुदान दिले जात असल्याची माहिती देखील यावेळी देण्यात आली. या जनजागृती मोहिमेत महावितरणचे सहाय्यक अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. राजेश भगत, सहाय्यक अभियंता श्री. पुष्पेंद्र सिंह, सहाय्यक अभियंता सौ. विजया पवार यांच्यासह महावितरणचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी स्थानिक स्तरावर नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी आणि योजनेच्या प्रसारासाठी नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, नितीन बोऱ्हाडे उपस्थित होते. योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन महावितरणच्या वतीने यावेळी करण्यात आले.

# छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रबोधन पर्व उपयुक्त : महापौर रवि लांडगे

## छत्रपती संभाजीनगर येथे प्रबोधन पर्वाची जोरदार तयारी सुरू, महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते रंगमंच उभारणीचा शुभारंभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

'छत्रपती संभाजी महाराज विचार प्रबोधन पर्व'च्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार, कार्य आणि इतिहास नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. १० मे ते १४ मे २०२६ या कालावधीत होणाऱ्या या विचार प्रबोधन पर्वात विविध सांस्कृतिक, प्रबोधनात्मक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी जागर निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रमही यानिमित्त राबविण्यात येणार आहेत, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने चिंचवड येथील छत्रपती संभाजीनगर येथे दि. १० मे ते १४ मे २०२६ या कालावधीत 'छत्रपती संभाजी महाराज विचार प्रबोधन पर्व' आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या तयारीला प्रारंभ झाला असून कार्यक्रमासाठी उभारण्यात येणाऱ्या रंगमंचाच्या कामाचा शुभारंभ महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य कुशाग्र कदम, तुषार हिंगे, निलेश नेवाळे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे यांच्यासह महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

छत्रपती संभाजी महाराजांचे व्यापक विचार आणि कार्य समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे तसेच या प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून नागरिकांना इतिहासाची प्रेरणा मिळेल, असा विश्वास महापौर रवि लांडगे व्यक्त केला.

यावेळी त्यांनी प्रबोधन पर्वाच्या तयारीच्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला आणि या कार्यक्रमाला येणाऱ्या नागरिकांना वाहनतळ, पिण्याचे शुद्ध पाणी, स्त्री-पुरूष स्वतंत्र स्वच्छतागृह तसेच आपत्कालीन सेवा यासारख्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचनाही केल्या.

# चाकण एमआयडीसीत खळबळ...

## दोन बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये बिबट्याने ठोकला तळ..

**पिंपरी | प्रतिनिधी**

चाकण एमआयडीसी परिसरातील दोन बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये बिबट्याने प्रवेश केल्याची घटना समोर आल्याने औद्योगिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. विशेषतः कुरुळी येथील एका नामांकित कंपनीच्या परिसरात बिबट्या सलग दोन दिवस तळ ठोकून असल्याची माहिती समोर आली असून, त्यामुळे कामगार आणि कर्मचारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळच्या सुमारास कंपनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या फिरताना दिसून आला. ही माहिती समोर आल्यानंतर कंपनी प्रशासनाने तातडीने वनविभागाशी संपर्क साधला. त्यानंतर वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली. मात्र, पहिल्या दिवशी बिबट्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही.

दरम्यान, गुरुवारी पुन्हा एकदा त्याच परिसरात बिबट्या दिसल्याची माहिती समोर आली. काही कामगारांनी प्रत्यक्ष बिबट्याला पाहिल्याचा दावा केला असून, त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये घबराट पसरली. कंपनी प्रशासनाकडून कामगारांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

वनविभागाने परिसरात शोधमोहीम सुरू केली. बिबट्या जवळील डोंगराळ किंवा झाडीच्या भागातून भक्ष्याच्या शोधात औद्योगिक परिसरात आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अद्याप बिबट्याला पकडण्यात यश आले नसून वनविभागाकडून नागरिकांना आणि कामगारांना अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कुरुळी येथील एका नामांकित कंपनीच्या परिसरात बिबट्या सलग दोन दिवस तळ ठोकून असल्याची माहिती समोर आली असून, त्यामुळे कामगार आणि कर्मचारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. चाकण एमआयडीसी सारख्या गजबजलेल्या औद्योगिक क्षेत्रात बिबट्याचा वावर आढळल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, परिसरात भीतीचे वातावरण कायम आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांचा दहावीचा निकाल 90.24 टक्के

{ पान १ वरून }

यंदा दहावीच्या परीक्षेसाठी महापालिकेच्या मराठी व उर्दू माध्यमाच्या २५ माध्यमिक शाळांमधून एकूण २ हजार ९२५ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी प्रत्यक्ष परीक्षेला २ हजार ९०९ विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी २ हजार ६२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १६ विद्यार्थी गैरहजर राहिले. तर २८४ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. यंदाच्या निकालामध्ये ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणारे ९३ विद्यार्थी, ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळविणारे ५८ विद्यार्थी असून, ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १७ इतकी आहे. तसेच २२ दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक व दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी स्मार्ट क्लासरूम, डिजिटल शिक्षण पद्धती, अनुभवी शिक्षकवर्ग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विशेष अतिरिक्त तास, सराव परीक्षा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व प्रयत्नांचे सकारात्मक फलित यंदाच्या निकालातून दिसून आले आहे.

विद्यार्थ्यांनी केलेल्या कठोर परिश्रमासोबतच शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याची भावना शिक्षण विभागाने व्यक्त केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे महापालिका प्रशासनाकडून अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# बांधकाम परवानगी अधिकारात बदल! महापालिका आयुक्तांचा धाडसी निर्णय

## अनधिकृत बांधकामांना चाप लावण्यासाठी आयुक्त नवल किशोर राम यांचा धाडसी निर्णय; 30 वर्षांपासून चालत आलेली मक्तेदारी अखेर मोडीत.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून देण्यात येणाऱ्या बांधकाम परवानगी अधिकारात मोठे बदल करण्यात आले आहेत. तब्बल तीस वर्षांपासून सर्व प्रकारच्या बांधकामांचे अधिकार महापालिकेच्या उपअभियंत्यांकडे होते. मात्र, आता त्यांच्याकडे केवळ २००० चौ. मीटरपर्यंतच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचे अधिकार असणार आहेत. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी गुरुवारी याबाबतचे आदेश काढले आहेत.

त्यात आता उपअभियंत्याच्या सोबतच कार्यकारी अभियंते आणि अधीक्षक अभियंत्यांकडेही बांधकाम परवानगीचे अधिकार तसेच जबाबदारी असणार आहे. या निर्णयामुळे शहरातील अनधिकृत बांधकामे तसेच बांधकाम विभागातील चुकीच्या कामांना पायबंद बसण्यास मदत होणार असल्याचा दावा महापालिका आयुक्त राम यांनी केला आहे.

कार्यकारी अभियंते आणि अधीक्षक अभियंत्यांनाही बांधकाम परवानगीचे अधिकार देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे अधिकारांचे केंद्रीकरण कमी होऊन अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. तसेच उपअभियंत्यांना इतर प्रशासकीय कामकाजासाठी अधिक वेळ देता येणार असल्याने विभागाच्या कामकाजात गतिमानता येण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच, वर्षानुवर्षे या अधिकारासह अनेक महत्त्वाचे अधिकार उप अभियंत्यांकडेच अधिकारांचे केंद्रीकरण झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी, महापालिका आयुक्तांनी शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांची स्वतंत्र बैठक घेऊन हे बदल केले आहेत. तर, उप अभियंत्यांचे बांधकाम परवानगीचे अधिकार कमी केल्याने त्यांना आता शहरातील अनधिकृत बांधकामांसह बांधकाम विभागाच्या इतर कामकाजांसाठी वेळ देता येणार असल्याने प्रशासकीय कामकाजात गतिमानता येणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.



### बांधकाम परवानगी प्रक्रियेत मोठे बदल

» पुणे महापालिकेकडून बांधकाम परवानगी अधिकारात मोठे बदल करण्यात आले असून, आता उपअभियंत्यांकडे केवळ २००० चौ. मीटरपर्यंतच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचे अधिकार असणार आहेत. नवल किशोर राम यांनी याबाबत आदेश जारी केले आहेत. यापुढे कार्यकारी अभियंते आणि अधीक्षक अभियंत्यांनाही बांधकाम परवानगीचे अधिकार देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे अधिकारांचे केंद्रीकरण कमी होऊन अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. तसेच उपअभियंत्यांना इतर प्रशासकीय कामकाजासाठी अधिक वेळ देता येणार असल्याने विभागाच्या कामकाजात गतिमानता येण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### असे आहेत नवीन बदल

» नवीन नियमांनुसार, २००० चौरस मीटरपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या प्रस्तावांना आता उप अभियंता स्तरावरच मान्यता दिली जाणार आहे. ज्या मिळकतींचे क्षेत्र २००० ते १०००० चौरस मीटरपर्यंत आहे, अशा सर्व ले-आऊट आणि बांधकाम प्रस्तावांच्या मंजुरीचे अधिकार कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले आहेत. १०००० चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेले किंवा पर्यावरण दाखल्याची आवश्यकता असलेले मोठे प्रकल्प अधीक्षक अभियंत्यांच्या मान्यतेने मार्गी लावले जातील. विशेष म्हणजे, कार्यकारी किंवा अधीक्षक अभियंत्यांनी प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर, त्याबाबतचे अधिकृत संमतीपत्र देण्याची जबाबदारी कनिष्ठ व उप अभियंता यांच्यावर सोपवण्यात आली असून, यामुळे प्रशासकीय कामात गतिमानता येणार आहे.

> अनियंत्रित वाढ, अतिक्रमणे आणि अनियमितता वाढीस कारणीभूत ठरलेल्या गेल्या ३० वर्षांच्या परंपरेला आता पूर्णविराम मिळणार आहे. नव्या व्यवस्थेमुळे शहरी विकासात अधिक पारदर्शकता, जबाबदारी आणि नियोजनबद्धता येण्याची अपेक्षा आहे.
>
> \- नवल किशोर राम, महापालिका आयुक्त

# 'हायटेक सिटी'चा मार्ग अखेर मोकळा, नगर विकास विभागाने अंतिम मान्यता दिली

## पुणे महानगर प्रदेशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील मुळा-मुठा पूररेषेचा अडथळा दूर

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेशातील महत्त्वाकांक्षी आणि राज्यातील पहिली 'हायटेक सिटी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या म्हाळुंगे-माण नगर रचना योजनेच्या अंमलबजावणीतील सर्व तांत्रिक अडथळे अखेर दूर झाले आहेत. मुळा आणि मुठा नद्यांच्या पूररेषेमुळे रखडलेल्या या योजनेच्या फेररचनेस राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने अंतिम मान्यता दिली आहे. तब्बल आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर या योजनेला गती मिळणार असून, या प्रकल्पाची जबाबदारी आता पुणे महानगरपालिकेकडे सोपवण्याच्या हालचालीही सुरू झाल्या आहेत.



पुणे महानगर क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी 'पीएमआरडीए'ची स्थापना झाल्यानंतर सुमारे २५० हेक्टर क्षेत्रावर म्हाळुंगे-माण ही पहिली आदर्श टीपी स्कीम हाती घेण्यात आली होती. २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते याचे थाटात उद्घाटन झाले होते. मात्र, त्यानंतर जलसंपदा विभागाने मुळा-मुठा नदीची नवीन पूररेषा निश्चित केल्याने योजनेत मोठे तांत्रिक फेरबदल करावे लागले. अनेक प्रस्तावित भूखंड पूररेषेत आल्याने संपूर्ण नकाशा बदलावा लागला, परिणामी ही योजना केवळ कागदावरच राहिली होती.

या घडामोडींमधील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे या योजनेचे 'नियोजन प्राधिकरण' बदलण्याची शक्यता. म्हाळुंगे-माण योजनेचा मोठा भूभाग आता पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाला आहे. पीएमआरडीएच्या नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत असा प्रस्ताव मांडण्यात आला आहे की, जी क्षेत्रे महापालिका हद्दीत आहेत, त्या टीपी स्कीम्सची अंमलबजावणी महापालिकेनेच करावी.

### फेररचनेला राज्य सरकारची मोहोर

» नदीच्या पूररेषेमुळे बाधित झालेल्या भूखंडांची फेररचना करून पीएमआरडीएने नवीन प्रारूप आराखडा तयार केला होता. यावर हरकती व सूचना मागवून लवादाची नेमणूक करण्यात आली होती. लवादाने जानेवारी २०२४ मध्ये आपला अहवाल सादर केल्यानंतर, राज्य सरकारने २९ एप्रिल २०२४ रोजी या सुधारित योजनेस अधिकृत मंजुरी दिली. यामुळे आता प्रत्यक्ष जमिनीचे सीमांकन आणि पायाभूत सुविधांच्या कामांना सुरुवात होण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

# शहर होणार 'आरएमसी प्लांट'मुक्त! सहा महिन्यांत प्रकल्प शहराबाहेर हलविणार

## आयुक्त नवल किशोर राम यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

धूळ आणि प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेल्या पुणेकरांना दिलासा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता कंबर कसली आहे. शहरातील रेडीमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्प येत्या सहा महिन्यांत शहराच्या हद्दीबाहेर हलविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेतल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

आयुक्त नवल किशोर राम यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पालिका प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पोलिस विभाग, क्रेडाईचे प्रतिनिधी आणि आरएमसी प्रकल्प चालक उपस्थित होते.

शहरातील वाढत्या नागरीकरणामुळे आरएमसी प्लांट वाढले असून, त्यातून उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे गंभीर विकार जडत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर शहराच्या सीमा निश्चित करून त्याबाहेर हे प्रकल्प स्थलांतरित केले जाणार आहेत

शहरात आणि विशेषतः नदीपात्रातील 'ब्लू लाइन' (निळी रेषा) क्षेत्रात अनधिकृतपणे सुरू असलेल्या आरएमसी प्रकल्पांना प्रशासनाने कोणताही दिलासा दिलेला नाही. असे बेकायदेशीर प्रकल्प कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. परवानगी नसलेले आणि नियमांचे उल्लंघन करणारे प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत सुरू ठेवू दिले जाणार नाहीत. शहराच्या विकासकामांवर परिणाम झाला होता. आरएमसी प्रकल्पांच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी येत्या 15 दिवसांत नियमावली तयार केली जाणार आहे. ही नियमावली लागू होईपर्यंत सध्याच्या अधिकृत प्रकल्पांवर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार नवी नियमावली जाहीर करण्यात येणार असून, त्यामुळे आरएमसीचालक संप मागे घेणार असल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले.



### प्रकल्पचालक संप घेणार मागे

» शहरात महापालिकेने आरएमसी प्लांटविरोधात मोहीम सुरू केली होती. या मोहिमेअंतर्गत काही आरएमसी प्लांट पाडण्यात आले होते. यानंतर आरएमसी प्लांटचालकांनी सर्व प्रकल्प बंद ठेवत संप पुकारला होता. यामुळे शहराच्या विकासकामांवर परिणाम झाला होता. त्यामुळे आज बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार नवी नियमावली जाहीर करण्यात येणार असून, त्यामुळे आरएमसीचालक संप मागे घेणार असल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले.

### 15 दिवसांत नवी नियमावली

» आरएमसी प्रकल्पांच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी येत्या 15 दिवसांत नियमावली तयार केली जाणार आहे. ही नियमावली लागू होईपर्यंत सध्याच्या अधिकृत प्रकल्पांवर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मात्र, ही सवलत केवळ अधिकृत प्रकल्पांसाठीच असून, शहराच्या हद्दीबाहेर जाण्यासाठी त्यांना 4 ते 6 महिन्यांचा अवधी दिला जाईल, असे आयुक्त राम म्हणाले

### प्रकल्पांसाठी आता 'वेळेचे' बंधन

» नियमावली तयार होईपर्यंत आरएमसी प्रकल्प चालविण्यासाठी प्रशासनाने वेळा निश्चित केल्या आहेत. त्यानुसार बुधवारी, शनिवारी आणि रविवारी सकाळी 6 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत. तर सोमवारी, मंगळवारी, गुरुवारी आणि शुक्रवारी सकाळी 11 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत हे प्रकल्प सुरू ठेवता येणार आहेत. या निश्चित वेळेव्यतिरिक्त प्रकल्प सुरू राहिल्यास संबंधित चालकांवर कडक दंडात्मक कारवाई केली जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पुरंदर विमानतळ भूसंपादनाच्या मोबदल्याचे वाटप सुरू

## प्रशासनाच्या या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी करण्यात येत असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला आता प्रत्यक्षात गती मिळाली असून, भूसंपादनाच्या मोबदल्याचे वाटप गुरुवार (दि. 7 मे) पासून सुरू करण्यात आले.

या प्रक्रियेतील पहिला धनादेश उदाचीवाडी येथील शेतकरी विलास कुंभारकर यांना प्रदान करण्यात आला. प्रशासनाच्या या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पुरंदर विमानतळ प्रकल्प हा पुणे जिल्ह्यासाठी महत्त्वाकांक्षी मानला जात असून, या प्रकल्पामुळे परिसरातील औद्योगिक, व्यावसायिक तसेच रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. विमानतळासाठी आवश्यक असलेल्या जमिनींचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया गेल्या काही महिन्यांपासून सुरू होती. त्यानंतर आता प्रत्यक्ष मोबदला वितरणाला प्रारंभ झाल्याने प्रकल्पाच्या कामकाजाला वेग मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

उदाचीवाडी येथे आयोजित कार्यक्रमात शेतकरी विलास कुंभारकर यांना पहिला धनादेश सुपूर्त करण्यात आला. या वेळी भूसंपादन अधिकारी कल्याण पांढरे, प्रांताधिकारी वर्षा लांडगे यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना पारदर्शक पद्धतीने मोबदला वितरित केला जाणार असल्याची ग्वाही दिली.

प्रशासनाकडून संबंधित शेतकऱ्यांची कागदपत्रे, सातबारा उतारे तसेच मालकी हक्काची पडताळणी पूर्ण करण्यात येत असून, टप्याटप्प्याने इतर शेतकऱ्यांनाही धनादेशांचे वितरण करण्यात येणार आहे. अनेक शेतकऱ्यांनी यापूर्वीच भूसंपादन प्रक्रियेस संमती दर्शविली असून, मोबदल्याच्या रकमेसह विकसित भूखंड देण्याच्या निर्णयामुळे सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

दरम्यान, विमानतळ प्रकल्पामुळे पुरंदर तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. रस्ते, पाणी, वीज आणि इतर पायाभूत सुविधांमध्ये वाढ होऊन परिसराचा आर्थिक चेहरामोहरा बदलणार असल्याचे मतही अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.



### मोबदला वाटपाला सुरुवात

» पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून शेतकऱ्यांना मोबदल्याचे धनादेश वाटप सुरू करण्यात आले आहे. या प्रक्रियेतील पहिला धनादेश उदाचीवाडी येथील शेतकरी विलास कुंभारकर यांना प्रदान करण्यात आला. यावेळी भूसंपादन अधिकारी कल्याण पांढरे आणि प्रांताधिकारी वर्षा लांडगे उपस्थित होते. विकसित भूखंडासह मोबदला देण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या प्रकल्पामुळे पुरंदर तालुक्यात उद्योग, रोजगार आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.